# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०१/१०/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

**अकस्मात मृत्यू**

१) पो.स्टे. भिवापुर :— अंतर्गत अडयाळ शेतशिवार येथे दिनांक ३०/०९/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान **पंढरी केशव कांबळे (मृतक), वय २२ वर्ष, रा. जैतपुर ता. लाखांदुर जि. भंडारा** हा ईलेक्ट्रीक लाईन जोडणीचे काम करीत असतांना झाडाची फांदी आडवी येत असल्याने झाडावर चढला व तोल गेल्याने झाडाचे खाली पडुन स्वताचे मृत्युस कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— आशिष नारायणराव मुन, वय ४० वर्ष, रा. हिंगणघाट जि. वर्धा, ह.मु. महेश मेश्राम यांचे घरी किरायणे भिवापुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रविण जाधव मो.न ९६८९९२५९२४ हे करीत आहे.

२) पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत शेंबडा येथे दिनांक २९/०९/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान **सुनिल मंगलू धुर्वे, वय ४६ वर्ष, रा. शेंबडा तह नरखेड** हा शेतातील पऱ्हाटी पिकावरील फवरणीचे विषारी औषध हा दारूचे नसेत प्राशन करून बाजेवर पडुन त्याचे पत्नीला मिळुन आला. त्याला उपचाराकरीता प्रथम सरकारी दवाखाना काटोल व नंतर रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे भर्ती केले असता दि. ३०/०९/२०२२ चे ०३:३० वा दरम्यान उपचारादरम्यान मरण पावला. सदर मरणाचे कागदपत्रे पोस्टे. नरखेडला प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेवंतीबाई सन्नीलाल धुर्वे, वय ४५ वर्ष, रा. शेंबडा यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते मो.क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

३) पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत मौजा कळंबी येथे दिनांक २५/०९/२०२२ चे १४.०० वा. दरम्यान **भुषण माधवराव भोयर(मृतक), वय २८ वर्ष, रा.कळंबी त.कळमेश्वर** याने दारूच्या नशेत विशारी औषध प्राशन केली. त्यामुळे त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचारकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे रेफर करून दि. २५/०९/२०२२ चे १६.४० वा. भरती केले. दि. ३०/०९/२२ चे ०९.१५ वा. डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषित केले. मर्ग सुचनेवरून सदरचा मर्ग दाखल करून चौकशीत घेतला.

सदर प्रकरणी पोहवा नझीर कुरेशी मेयो पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई परवेज हे करीत आहे.

**४) पो.स्टे. वेलतुर** :— अंतर्गत मौजा डोंगरमौदा शिवारातील आम नदीवर येथे दिनांक ०१/१०/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास यातील गावातील मुले आंघोळी करीता गेले असता त्यांना डोंगरमौदा ते मांढळ रोडवरील आम नदीचे पुलाजवळील पिल्लराला एक अनोळखी इसमाचे प्रेत उबडया अवस्थेत अडकलेले दिसले त्यामुळे त्यांनी लगेच सदरची माहिती फिर्यादी व पोलीसांना दिली असता फिर्यादी यांनी आम नदीजवळ येवुन पाहिले असता नदीचे मधोमध असलेल्या पिल्लराजवळ पाण्यावरती एक प्रेत लटकलेले दिसले आले.

**मृतकाचे वर्णन**:— एक पुरुष जातीचे प्रेत, वय अंदाजे ४५ ते ५० वर्ष, उंची १७० से.मी.केस अर्धवट पिकलेले, चेहरा गोल, बांधा—मजबूत, दाढी—थोडीशी वाढलेली, पेहराव—अंगावर कपडे नाहीत,कुठल्याही प्रकारचे दागीने नाहीत.

याबाबत कोणालाही माहिती असल्यास पो.स्टे. वेलतुर येथे १) सपोनि/सतिश पाटील, ठाणेदार पो.स्टे.वेलतूर मो.नं.८८०५२५३९८२, २) पोहवा रविंद्र फरकाडे,पो.स्टे.वेलतूर मो.नं.९८२२७६७८३३ वर कृपया संपर्क साधावा.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संजय किसन भोतमांगे, वय ५० वर्ष, रा.डोंगरमौदा (पोलीस पाटील) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार रविंद्र फरकाडे हे करीत आहेत.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर